# वसई-विरार शहर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय विरार

दि.२१/०१/२०२४

## <u>जाहीर आवाहन</u>

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाकडे मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्याचे काम सोपविले आहे. त्यानुसार राज्यातील सर्व ग्रामीण व शहरी भागातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. हे सर्वेक्षण शासकीय यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे. वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातही सदरील सर्वेक्षण **<u>दि.२३ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२४</u>** या कालावधीत करण्यात येणार आहे. या सर्वेक्षणाच्या कामासाठी महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना प्रभागनिहाय जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून घरोघरी भेट देऊन माहिती घेण्यासाठी प्रगणक नेमण्यात आलेले आहेत.

शासनाने दिलेल्या विहित कालावधीत सर्वेक्षणाचे काम पूर्ण होणे आवश्यक असल्याने महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांनी आपल्याकडे सर्वेक्षणासाठी येणाऱ्या प्रगणक कर्मचाऱ्यांना वेळेत योग्य ती माहिती देऊन सर्वेक्षणाच्या कामात महानगरपालिकेला सहकार्य करावे असे आवाहन वसई विरार शहर महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना करण्यात येत आहे.

**मुख्य कार्यालय विरार**
**वसई विरार शहर महानगरपालिका**